☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103
नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट/280/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 16/07/2025

# 1)खुन(हुंडाबळी) :–

**मुखेड** :–दिनांक 09.07.2025 रोजी 10.30 वा. ते दिनांक 10.07.2025 रोजी चे दरम्यान वेळ नक्की नाही, **मौ. राठोड वाडी तांडा ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपी नामे 1.सुधाकर राजाराम राठोड, 2. राजाराम सदाशिव राठोड, 3. मोत्याबाई राजाराम राठोड, 4. सदाशिव राजाराम राठोड सर्व रा. राठोड वाडी (अखरगा) ता. मुखेड यांनी संगणमत करून यातील मयत मुलगी आरोपी क्रमांक 1 ची पत्नी नामे ताऊबाई भ्र. सुधाकर राठोड, वय 18 वर्षे, रा. राठोड वाडी तांडा ता. मुखेड हिस लग्नामध्ये ठरल्याप्रमाणे एक लाख रूपये हुंडा घेऊन ये म्हणुन मयत मुलीस हुंडयासाठी शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देऊन विष पाजल्यामुळे उपचारादरम्यान दिनांक 13.07.2025 रोजी 06.00 वा. चे सुमारास मरण पावली. यातील आरोपीतांनी मयत मुलीचा हुंडाबळी घेतला. वगैरे **फिर्यादी वामन देवला चव्हाण, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. वसुर तांडा ता. मुखेड जि. नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 163/2025 कलम 103(1), 80(2), 85, 352, 351(2),351(3), 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री माने, मो.क्रं. 7709316909** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :–

**बारड** :– दिनांक 14.07.2025 रोजी 22.00 वा. ते दिनांक 15.07.2025 रोजी 06.30 वा. चे दरम्यान, **मुदखेड रोड पांढरवाडी शिवार येथील मराठा बार हॉटेल व मयुरबार ता. मुदखेड जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी यांचे मराठा बार रेस्टॉरंट तसेच शेजारील मयुर बार यांचे पाठीमागील दरवाजाचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून दोघांच्या बार मधील विदेशी दारू किंमत 1,59,340/–रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी दिगंबर दामोदर कल्याणकर, वय 41 वर्षे, व्यवसाय बार मालक रा. शेंबोली ता. अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे बारड** गुरनं 91/2025 कलम 331(4), 305(अ) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुदाम आडे, मो. नं.** 9752060875 हे करीत आहेत.

# 3)अवैध रेती चोरी :–

**1)भाग्यनगर** :– दिनांक 15.07.2025 रोजी 08.45 वा. चे सुमारास, **डिमार्ट समोरील सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** आरोपी नामे अनिल चांदु सुर्यवंशी, वय 28 वर्षे, व्यवसाय चालक रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नांदेड हा टाटा कंपणीचा टेम्पो क्रमांक 407 एमएच–04/इएल–7362 किंमत 4,00,000/–रू मध्ये एक ब्रास रेती किंमत 6,000/–रू विना परवाना बेकायदेशिररित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतूक करीत असतांना मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री नरेश केशव वाडेवाले, नेमणूक पोस्टे भाग्यनगर** यांचे फिर्यादीवरून **पोस्टे भाग्यनगर गुरनं 409/2025** कलम 303(2), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/शिंदे, हणमंत , मो. नं. 9309970858** हे करीत आहेत.

**2)मांडवी** :– दिनांक 15.07.2025 रोजी 12.00 वा. चे सुमारास, **उमरी बाजार ते बेगम बाई तांडा जाणाऱ्या रस्त्यावर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील ग्राम महसुल पथकातील फिर्यादी यांनी आरोपी नामे 1. ट्रॅक्टर चालक 2.तुळशिराम धीरबसी रा. टेंभी तांडा (मथुरा) ता. किनवट हे विना परवाना बेकायदेशिररित्या स्वराज कंपणीचा विना नंबरचे ट्रॅक्टर मध्ये रेतीची चोरटी विक्री करीता नेत असतांना महसुल पथक प्रमुख शिवदास पटणे यांनी सदर ट्रॅक्टर पोलीस स्टेशन मांडवी येथे घेवुन जाण्यास सांगीतले असता यातील आरोपीतांनी सदर रेतीचा ट्रॅक्टर पोलीस स्टेशनला ने नेता भरधाव वेगाने बेगम बाई तांडाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ट्रॅक्टर मधील अवैध रेती टाकुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी मंगेश पि. तातेश्वर बोधे, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी (ग्राम महसुल अधिकारी सज्जा उमरी बाजार) ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरून **पोस्टे मांडवी गुरनं 65/2025** कलम 303(2),221 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2720 अस्वले, मो. नं. 9511212420** हे करीत आहेत.

**3)माहुर :—** दिनांक 15.07.2025 रोजी 03.00 वा. चे सुमारास, **मौ. धानोरा शिवारातील पैनगंगा नंदी पात्रात ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील ग्राम महसुल पथकातील फिर्यादी यांनी आरोपीचे ट्रॅक्टर नं. 1 व 2 चे चालक व मालक विना नंबरचे 03 ट्रॅक्टर मध्ये पाच ब्रास वाळु किंमत 30,000/—रू चा विना परवाना बेकायदेशिररित्या उपसा करून चोरी केली. वगैरे **फिर्यादी** ज्ञानेश्वर विठ्ठल पेंटेवाड, **वय 56 वर्षे, व्यवसाय नौकरी (ग्राम महसुल अधिकारी तहसील कार्यालय माहुर) ता. माहुर जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरून **पोस्टे माहुर गुरनं 115/2025** कलम 303(2), 3(5) बीएनएस—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/एस एस आनेबोईनवाड, मो. नं. 9011149597** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :—

**शिवाजीनगर :—** दिनांक 04.07.2025 रोजी 10.30 वा. ते दिनांक 09.07.2025 चे दरम्यान, **शिवाजीनगर नांदेड येथे,** यातील महीला आरोपी यांनी फिर्यादीचे मोबाईलवर व्हॉटसअपवर व्हॉईस व व्हिडीओ कॉल करून आपले नाव सांगुन ती सीबीआयची मुख्य अधिकारी आहे फिर्यादीचे नावे मुंबई येथील बँकेचे खाते असल्याचे सांगुन तुम्ही तुमचा मोबाईल बंद करा व माझ्या खात्यात रक्कम जमा करा नाहीतर सि बी आय मार्फत तुम्हाला अटक करण्यात येईल अश्या प्रकारच्या धमक्या दिल्याने फिर्यादी यानी घाबरून आरोपी खातेदार यांचे नावे 28,00,000/—रू जीएसटी द्वारे जमा केले. तरी महीला आरोपीने फिर्यादीस धमकी देवुन आपल्या खात्यावर पैसे टाकुण घेवुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी खंडोजी पि. तोलाजी बायस, वय 72 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. घर क्रमांक 94 रामराव पवार मार्ग श्रीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 290/2025 कलम 318(1), 204(2), 351(1), बीएनएस—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री थडवे, मो.नं.** 9765391131 हे करीत आहेत.
9422872881 हे करीत आहेत.

## 5)जुगार :—

**बिलोली :—** दिनांक 15.07.2025 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **पत्राच्या ओपन शेडमध्ये एम के ज्युस सेंटर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. जलील रमजान शेख, वय 51 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देशमुख नगर बिलोली 2. मोहन संभाजी कुडके, वय 22 वर्षे, रा. साठेनगर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड हे विना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 6660/—रु व जुगाराचे साहित्यासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1485 निरंजन माधव अंबुरे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 198/2025 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2351 मुद्देमवार, मो.क्रं. 9049778709** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड